## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर

## प्रेस नोट दि.१८/०६/२०१९

## दि.१७/०६/२०१९ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वारजे पो स्टे २४५/१९,भादविक ३९५,३२३,५०४,५०६(२),क्रीमी.लॉ ॲमेडमेंट ॲक्ट ७ |
| **फिर्यादी** | आयुब पठाण,वय-५४,रा.गोकुळनगर पठार,वारजे माळवाडी,पुणे |
| **आरोपी** | राजु लक्ष्मण गहलोत,वय-२३,रा.आहिरे गाव,वारजे,पुणे व इतर पाच अनोळखी इसम (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१७/०६/२०१९ रोजी ०४/०० वा.जयहिंद चिकन सेंटर व कोमल चिकन सेंटर,सहयोगनगर पाण्याचे टाकीचे अलीकडे वारजे,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमांनी जयहिंद चिकन सेंटर या दुकानातुन चिकन खरेदी करण्याचे बहाण्याने येवुन,जबरदस्तीने दुकानात घुसुन दहशत निर्माण करुन, दुकानात असलेल्या सत्तुरचा धाक फिर्यादीस दाखवुन,त्यांचे दुकानातील २,०००/- रुपये रोख जबर दस्तीने हिसकावुन घेतले. तसेच फिरोज गुलाल शेख यांचे कोमल चिकन सेंटर या दुकाना मध्ये बळजबरीने घुसुन त्यांना शिवीगाळ व दमदाटी करुन,दुकानात विक्रीसाठी ठेवलेल्या अंडयांचा ट्रे खाली ढकलुन तोडफोड केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. नेताजी गंधारे ८८८८३३९३३९ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | भारती विद्यापीठ पो स्टे ४३५/१९,भादविक ४२०,माहिती व तंत्रज्ञान का.क.६६(क)(ड) |
| **फिर्यादी** | एक पुरुष,वय-४८ वर्षे,रा.मांगडेवाडी,कात्रज,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात मोबाईलधारक इसम व महिला (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१०/१२/२०१८ ते दि.१०/०१/२०१९ रोजीचे कालावधीत फिर्यादीचे राहते घरी ऑनलाईन माध्यमाव्दारे |
| **तपशिल** | यातील नमुद अज्ञात मोबाईलधारक इसम व महिला यांनी ऑनलाईन नामांकीत खाजगी फायनान्स होम लोन डिपार्टमेन्ट मधुन बोलत आहे, तुम्हाला १३ लाख रुपयाचे होम लोन करुन देतो असे सांगुन,त्यांना वेळोवेळी टॅक्स इन्सुरन्स, प्रोसेसींग फि अशी वेग-वेगळी कारणे देवुन,फिर्यादी यांचेकडुन वेळोवेळी सदर इसमांचे बॅंकेचे खात्यावर एनएफटीव्दारे एकुण १,९२,६००/- रुपये भरावयास सांगुन फिर्यादी यांची ऑनलाईन फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.निरी.(गुन्हे) विष्णु ताम्हाणे ९८२३१९५०९४ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | बिबवेवाडी पो स्टे १९८/१९,भादविक ४२० |
| **फिर्यादी** | एक पुरूष,वय-६३ वर्षे,रा.बिबवेवाडी,पुणे |
| **आरोपी** | एक अनोळखी इसम, वय अंदाजे २५ वर्षे, उंचीने साधारण ५ फुट, रंगाने सावळा व अंगा मध्ये शर्ट पॅन्ट घातलेला (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०२/०३/२०१९ रोजी दुपारी १२/०० वा.रासकर पॅलेस,अप्पर बिबवेवाडी,पुणे येथील बॅंकेच्या ए.टी.एम. सेंटर मध्ये |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे नातीच्या प्रवेशासाठी पैसे लागणार असल्याने त्यांनी नमुद ठिकाणी असलेल्या बॅंकेचे ए.टी.एम. मध्ये पैसे काढण्यासाठी गेले असता,नमुद वर्णनाचे अनोळखी इसमाने फिर्यादी यांचेकडील ए.टी.एम. कार्डची हातचलाखीने परस्पर बदली करुन,त्यांचे बॅंकेतील वेग-वेगळया ए.टी.एम. सेंटर मधुन तसेच एका इसमाचे बॅंकेचे खात्यावर पैसे ट्रान्सफर करुन फिर्यादी यांची एकुण ६०,०००/- रुपयेची फसवणुक केली आहे. (फिर्यादी यांनी तक्रारी अर्ज केल्यानंतर,अर्जाचे चौकशीवरुन तात्काळ गुन्हा दाखल करण्यात आला आहे.) |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. के.डी.पावसे ८१०८१८१८६४ |

४

**पो.स्टे.गुरनं./कलम** वानवडी पो स्टे ३६०/१९,भादविक ४२०,४६५,४६८,४७१,३४,विधी व न्याय विभाग सन २०१३ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.२०,महाराष्ट्र कृषी पशु व मत्स विज्ञान,आरोग्य विज्ञान उच्च व तंत्र व्यवसाय शिक्षण यामधील अनाधिकृत संस्था व अनाधिकृत पाठयक्रम प्रतिबंध अधिनियम २०१३ चे कलम १०(१)(२)(३) प्रमाणे

**फिर्यादी** हरिभाऊ शिंदे,वय-५२ वर्षे, शिक्षण संचालनालय,उच्च शिक्षण कार्यालय,मध्यवर्ती इमारत पुणे स्टेशन,पुणे

**आरोपी** एकुण चार इसम (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** सन २०१६ पासुन ते माहे मे २०१९ रोजीपर्यंत इंटरनॅशनल रिलेशन ऑफिस १२,बी.प्रमदीप मलबार हिल समोर गेरा स्केवर लुल्लानगर,पुणे येथे

**तपशिल** यातील नमुद इसमांनी संगममत करुन 'कॉमनवेल्थ व्होकेशनल युनिव्हसिर्टी किंगडम ऑफ टोगा' या विद्यापीठाची शासनाची कोणत्याही प्रकारची मान्यता न घेता,कॉमनवेल्थ व्होकेशनल युनिव्हसिर्टी,पुणे यानावाने नमुद ठिकाणी सन २०१६ पासुन खोटी व बनावट कॉमनवेल्थ व्होकेशनल युनिव्हसिर्टी स्थापन करुन,त्याचे खोटे व बनावट माहीती पत्रके तयार करुन,ती सर्वत्र प्रसारीत करुन,खोट्या व बनावट पीएडी / डी.लीट/ डी.एस.सी. टॉपीक्स या पदव्या लोकांना विकुन, स्वतःचा आर्थिक फायदा करुन घेवुन,नागरीकांची व शासनाची दिशाभुल करुन फसवणुक केली आहे. (सदरचा गुन्हा हा अर्जावरुन विधी अधिकारी यांचा सल्ला घेवुन दाखल करण्यात आला आहे.)

**त.अंमलदार** पो.उप.निरी. डी.व्हि.गुर्जर ९६५७०६८८१०

५

**पो.स्टे.गुरनं./कलम** स्वारगेट पो स्टे ३०२/१९,भादविक ३८८,३७९

**फिर्यादी** एक पुरुष,वय-६२,रा.कामोठे,नवी मुंबई

**आरोपी** एक अनोळखी इसम, अंगाने मध्यम, उंची अंदाजे ५ फुट ३ इंच, रंगाने सावळा, वय अंदाजे ३५ ते ४० वर्षे, पांढरा शर्ट व फॉरमल पॅन्ट, सोबत काळया रंगाची सॅक, हिंदी व मराठी भाषा बोलतो.

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.२८/०५/२०१९ रोजी १३/१५ वा. भोर ते परेल या एस.टी. बस मध्ये स्वारगेट डेपो येथुन

**तपशिल** यातील फिर्यादी हे मुंबईला जाण्यासाठी स्वारगेट बस डेपो येथे येवुन, भोर ते परेल या मार्गावरील एस.टी. बस मध्ये कंडक्टरचे मागील सीटवर बसले असताना,यातील नमुद अनोळखी इसमाने फिर्यादी यांचे शेजारी रिकाम्या असलेल्या सीटवर बसुन,त्यांना बोलण्या मध्ये गुंतवुन,विश्वासात घेवुन,फिर्यादी यांना गुंगीचे औषध असलेले मिश्रीत पाणी पिण्यास व बिस्कीट खाण्यास भाग पाडुन,त्यांना साधारणपणे चांदणी चौक येथे गुंगी आल्यानंतर,सदर इसमाने फिर्यादी यांचे दोन्ही हातातील सोन्याचे तीन अंगठया व गळयातील सोन्याची चेन असा एकुण १ लाख रू किचा ऐवज चोरून नेला आहे. (फिर्यादी यांनी मुंबई येथे औषधोपचार करून तक्रार दिल्याने गुन्हा दाखल केला आहे. )

**त.अंमलदार** म.पो.उप.निरी. जे.वाय.कडु ९०९६००९२१५

६

**पो.स्टे.गुरनं./कलम** खडकी पो स्टे २३०/१९,भादविक ३८४,३८५

**फिर्यादी** एक सज्ञान महिला,वय-२८ वर्षे,रा.पुणे

**आरोपी** चेतन अशोक खोसे,रा.फ्लॅट नं. २०४,बिल्डींग नं.बी-४,माऊंटवर्ड प्रिस्टीन सोसायटी,औंध रोड, पुणे (अटक)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** माहे मे २०१८ ते दि.०५/६/२०१९ रोजी २३/३० वा. पर्यंत फिर्यादीचे राहते घरी

| | |
|---|---|
| **तपशिल** | यातील नमुद इसम चेतन अशोक खोसे याने फिर्यादी यांचेशी ओळख करुन,त्यातुन ओळख निर्माण करून, त्याबाबत फिर्यादी यांचे घरचे लोकांना सांगतो अशी फिर्यादी यांना धमकी देवुन,त्यांचेकडे वेळोवेळी पैशाची मागणी करुन,फिर्यादी यांना एकुण ६,१८,०००/- रुपये रक्कम देण्यास भाग पाडले. तसेच त्यानंतर सुद्धा सदर बाबत घरच्यांना सांगतो अशी धमकी देवुन फिर्यादीस भिती घालण्याचा प्रयत्न केला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.हवा. डी.आर.गबाले ९४०४७२२८७७ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**